**सातारा जिल्हा परिषद**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जाहिर ई-निविदा सुचना – पहिली वेळ**

---

दुरध्वनी क्र. ०२१६२-२३०२२६ ई-मेल- eebnsatara@rediffmail.com

सातारा जिल्हा परिषदेच्यावतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांचे तर्फे नोंदणीकृत/परवानाधारक कंत्राटदारांकडून/पुरवठादारांकडून जिल्हा परिषद अंतर्गत असणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व उपविभागांसाठी ११ महिन्याकरीता भाडेतत्वावर वाहने घेणे व दरकरार करणेबाबत. दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. संपूर्ण निविदा प्रसिद्धी ही ऑनलाईन (ई-टेंडरींग) पद्धतीने राहिल.

| अ.नं. | कामाचे नांव | कोऱ्या निविदा नमुन्याची विक्री रक्कम रु. | बयाणा रक्कम रुपये | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १. | वाहने भाडयाने घेणेकरीता दरकरार करणेबाबत.<br>बोलेरो/टाटा सुमो<br>आसन क्षमता कमीत कमी ५+ १<br>महिना पॅकेज प्रमाणे दर १. ३००० कि.मी. साठीचा दर २. ३००० कि.मी. च्या पुढील वाढीव प्रत्येक कि.मी. साठीचा दर.<br>अटी १) सर्व वाहनाचे उत्पादन वर्ष जानेवारी २०१३ नंतरचे असावे. २) परमिटचीच वाहने असने बंधन कारक आहे. | १०००/- | ४४००/- | निविदा मंजूरी पासून १ वर्ष |

ई-निविदे संदर्भातील कागदपत्रे, अटी व शर्ती यांची माहिती पाहण्यासाठी व डाऊनलोड करणेसाठी ***"http://mahatenders.gov.in"*** या वेबसाईटवर दि. ०२/०७/२०१८ रोजी १५.०० पासुन दि. ०९/०७/२०१८ रोजी १७.०० वाजे पर्यंत उपलब्ध राहील. निविदा धारकाने परिपुर्ण निविदा ही दि. ०२/०७/२०१८ रोजी १५.०० पासुन दि. ०९/०७/२०१८ रोजी १७.०० वाजे पर्यंत इलेक्ट्रॉनिक फॉरमॅटमध्ये ***"http://mahatenders.gov.in"*** या वेबसाईटवर सादर करावयाच्या आहेत. निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. सातारा यांचे नांवे ऑनलाईन जमा करणेची आहे. व त्याची रिसीट निविदा कागदपत्रासोबत ऑनलाईन अपलोड करावी. कव्हर १ मध्ये नेट बँकींग व्दारे ऑनलाईन जमा रक्कमेची पोहोच/प्रत नसलेस आपली निविदा उघडणेत येणार नाही. निविदा दि. ११/०७/२०१७ रोजी ११.०० वाजता उघडणेत येतील.

निविदा स्विकृत्तीचे बंधन निविदा मंजूर करणा-या अधिका-यावर नाही. काहीही कारण न देता कोणतीही निविदा नाकारणेचा अगर स्विकारणेचा अधिकार सक्षम अधिका-याने राखून ठेवला आहे. निविदा नाकारणे बद्दल कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेत स्पष्टीकरण मागता येणार नाही.

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद,सातारा.**

# <u>निविदा धारकाकरीता अटी व शर्ती</u>

१. वाहन ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांचे अधिनस्त संबधित विभाग व उपविभाग यांचे ताब्यात राहील.

२. वाहन भाडेतत्वावर घेण्याचा कालावधी हा ११ महिन्याचा राहिल.

३. जर एखादया महिन्यामध्ये सदरचे वाहन ३००० कि.मी. पेक्षा जास्त चालविणे भाग पडले तर त्याचे त्यासाठी देय असणारा कि.मी. चा दर हा निविदेद्वारे निश्चित झालेप्रमाणे देण्यात येईल.

४. वाहनाच्या वापराचे कार्यक्षेत्र संपूर्ण सातारा जिल्हा राहील.

५. वाहनाचा वापर आवश्यकते प्रमाणे ग्रामीण भाग, डोंगराळ व अतिदुर्गम भागात केला जाईल.

६. वाहन सदैव सुस्थितीत असावे.

७. कार्यालयीन कामकाजासाठी महाराष्ट्रात जिल्ह्याबाहेर इतर कोठेही आवश्यकता भासल्यास जावे लागेल.

८. किरकोळ अथवा मोठ्या स्वरुपाची दुरुस्ती करणे ही वाहन मालकाची जबाबदारी राहील.

९. किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती १ दिवसामध्ये तर मोठया स्वरुपाची दुरुस्ती कमाल ३ दिवसात करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

१०. वाहनाची देखभाल व दुरुस्ती तसेच इंधन, वंगण, विमा, सेवाकर, वाहन चालकाचा खर्च (वेतन भत्ते, प्रवासभत्ता इ.)व इतर खर्च वाहन मालकाने करावयाचा आहे.

११. कार्यरत वाहन नादुरुस्त झाल्यास संबधीत सेवा पुरवठादाराने त्वरीत पर्यायी वाहन व्यवस्था करणे बंधनकारक राहील, अन्यथाअन्य वाहन वापरलेमुळे होणारा जादा खर्च सेवा पुरवठादाराकडून वसूल करणेत येईल.

१२. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व उपविभाग यांचे करारनामा करतेवेळी विभागाच्या मागणीनुसार वाहनास प्रवासी वाहतुकीचा प्रादेशिक परिवहन परवाना (Permit) असणे आवश्यक आहे. तसेच आर.सी./टी.सी. फिटनेस सर्टिफिकेट गाडीचे ईन्सुरन्स, वाहनचालकाकडे LMV(TR) परवाना इ. कागदपत्र सादर करने बंधन कारक आहे.

१३. वाहनचालकाचे निवासाची, भोजनाची व वाहन चालकाचा खर्च याची जबाबदारी कार्यालयाची राहणार नाही.

१४. वाहन फक्त वाहनमालकाने नियुक्ती केलेल्या अधिकृत टुरिस्ट लायसन्स धारक वाहनचालकानेच चालवावयाचे आहे.

१५. ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर होईल त्यास शासकिय नियमानुसार अनामत/सुरक्षा ठेव/ राष्ट्रीय बँकेकडील कायम सुरक्षा ठेव पावतीच्या स्वरुपात द्यावी लागेल. तद्नंतर १००/- स्टॅम्प पेपरवर करारनामा (कार्यालयीन नमुन्यानुसार ) स्वखर्चाने करुन द्यावयाचा आहे.

१६. टेंडर मंजूर झाल्यानंतर ७ दिवसात अनामत रक्कम भरणा अथवा करारनामा कार्यवाही न केल्यास इसारा रक्कम जप्त करण्यात येईल व निविदा रद्द करण्यात येईल.

१७. करारनामा कालावधीत इंधन, वंगण, सुटे भाग,वाहनचालकाचे वेतन व भत्ता इत्यादी मध्ये वाढ झाली तरीही मान्य दरानुसारच करारनामा संपेपर्यंत सेवा पुरविणेची आहे. सदरचे दर १ वर्ष कालावधीकरिता लागू राहतील.

१८. करारनामा कालावधीत वाहनाचा अपघात किंवा नेसर्गिक आपत्ती झालेस त्याची पूर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील व तसेच अपघातामुळे कार्यालयाचे, इसमाचे अगर मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई निविदा धारकाने करुन द्यावी लागेल.

**१९. वाहन पूर्ण काळ म्हणजे २४ तास उपलब्ध असावे. कार्यरत वाहन नादुरुस्त झाल्यास संबधीत एजन्सीने त्वरीत पर्यायी** व्यवस्था करणे बंधनकारक राहील. तसेच अन्य वाहन वापरलेमुळे होणारा जादा खर्च आपलेकडून वसूल करणेत येईल. दुरुस्ती अथवा वाहन चालकाअभावी वाहन बंद राहून कार्यालयाची गैरसोय झाल्यास १५००/- रु प्रती दिन दंड आकारण्यात येईल व सलग ७ दिवस वाहन उपलब्ध न झाल्यास करार रद्द करण्यात येऊन भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२०. शासकीय नियमाप्रमाणे देयकातुन कर (Taxes) इ. वजावटी केल्या जातील त्या बंधनकारक राहतील.

२१. सेवा पुरवठादारांची सेवा समाधानकारक वाटल्यास आणि खात्यास तशी आवश्यकता वाटल्यास ११ महिन्यानंतर अथवा पुढील दरकरार होईपर्यंत सेवा पुरवावी लागेल त्यासाठी मंजूर दराप्रमाणेच देयकाची अदाई करण्यात येईल.

२२. करारनामा लिहून देणार यांना करारनामा संपुष्टात आणवयाचा असल्यास १ महीन्याची अगावु नोटीस देणे बंधनकारक राहील.

२३. निविदेमध्ये नमूद वाहनप्रकारानूसार एकुण वाहन मागणी विचारात घेता वाहने ही एजन्सीच्या मालकीची अथवा एजन्सीकडे अधिकृत नोंदणी प्रमाणपत्र यादीसह सादर करणे आवश्यक आहे.

२४. निविदाधारकाची निविदा मंजूर होवून करारनामा झाल्यावर तसेच वाहन पुरवठा आदेश दिल्यानंतर ७ दिवसात वाहन न पुरविल्यास /करारनाम्यातील अटी व शर्ती पालन न केल्यास संबधीत निविदाधारकाचे करारनामा रद्द करून नाव काळ्या यादीत समाविष्ट केले जाईल याची नोंद घ्यावी.

२५. वाहनाचे कार्यक्षेत्र सातारा जिल्हा असून सदरचे वाहन मागणीनुसार जि.प. सातारा येथील मुख्यालयातील कार्यालये व तालुका स्तरावरील पंचायत समितीची कार्यालये यांना हा पुरवठा करावयाचा आहे. सदर बाब लक्षात घेवून सेवा पुरवठादारास विभागाकडून आदेश दिल्यानंतर जिल्हा व तालुकास्तरावर तात्काळ १ दिवसात वाहन उपलब्ध करून देणेची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील.

२६. वाहनाची /चालकाची सर्व कागदपत्रे जसे वाहन नोंदणी प्रमाणपत्र, कर प्रमाणपत्र, विमा ,योग्यता प्रमाणपत्र ,वाहन परवाना (परमीट), पीयूसी, चालकाची अनुज्ञप्ती इत्यादी वैध असणे आवश्यक असून ती जवळ बाळगणे आवश्यक राहील.

२७. कागदपत्रांची तपासणी करीता मागणी केलेस मुळ प्रती सादर करणेचे बंधनकारक राहील.

२८. जानेवारी २०१३ नंतर आर. टी. ओ. नोंदणी वर्ष असणा-या वाहन धारकांची निविदा ग्राहय धरण्यात येईल.

२९. वाहन दरमहा किमान २,००० कि.मी. व जास्तीत जास्त ३००० कि.मी. पर्यतच आवश्यकतेनुसार वापर करण्यात येईल.

३०. वाहन दुरुस्तीसाठी होणारी धाव कार्यालयाच्या कामकाजाच्या धावेत समाविष्ट असणार नाही.

३१. भाडयाने घेण्यात येणारे वाहन हे केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ६६ अन्वये योग्य तो परवाना, वाहन फिटनेस सर्टीफिकेट असणाऱ्या वाहनाचीच निविदा स्विकारली जाईल. ज्या वाहनाना वर नमुद केलेप्रमाणे परिवहन अधिकारी यांचा परवाना नाही अशा वाहन धारकांनी निविदा भरु नये, त्यांची निविदा स्विकारली जाणार नाही.

३२. एक अथवा सर्व निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवला आहे.

३३. कार्यालयीन वापरानंतर वाहन जि.प. परिसरात मध्ये लावणेचे आहे.

३४. स्पर्धात्मक निविदाद्वारे सर्वात कमी दराने वाहन भाडयाने घेण्यात येईल.

३५. वाहन कसल्याही सबबीवर खाजगी वापरणेस मिळणार नाही.

३६. सेवा पुरवठादाराने प्रत्येक वाहनासाठी तशीलवार माहिती असलेले स्वंतत्र लागबुक ठेवावे.

३७. प्रत्येक वाहनाचा व वाहन चालकांचा विमा उतरविणे वाहन मालकावर बंधन कारक राहील.

३८. प्रत्येक वाहन आर. टी. ओ. नोंदणी जानेवारी २०१३ पासून पुढील असणे बंधनकारक राहील.

३९. पुरविण्यात येणा-या वाहनाची आसन क्षमता परमिटनूसार असावी.

४०. वाहने प्रत्यक्ष भाड्याने लावणेपूर्वी प्रत्येक वाहनाच्या सुस्थितीबाबत तपासणी, आसन क्षमता, वाहनांची आर.सी /टी.सी, वाहन वीमा, वाहन परवाना, पी.यु.सी., फिटनेस सर्टिफिकेट वाहन चालकाचे परवाना वैधता इत्यादी बांबीची तपासणी संबधित विभागाने करावयाची आहे.

४१. सदर दरकरानूसार विभागाने वाहन भाड्याने लावणेपुर्वी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. सातारा यांची प्रशासकिय मान्यता व आर्थिक खर्चाची मान्यता घेणे संबधित विभागास बंधनकारक राहील.

42. लखोटा क्र.1 मध्ये को-या निविदा रकमेचा व बयाणा रक्कमेचा ऑनलाईन भरणा केले बाबतची पावती व पुढील प्रमाणे कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडाव्यात 1. वाहनाच्या आर.सी. व टी.सी. पुस्तकाची प्रमाणीत झेरॉक्स प्रत 2. वाहनाच्या विमा पॉलिसिची प्रत 3. वाहन चालकाचा वैध परवाना 4. पीयुसी प्रमाणपत्र प्रत 5. ट्रान्सपोर्ट परवाना असणे 6. ट्रान्सपोर्ट टॅक्स भरले बाबतचे प्रमाणपत्र.

43. लखोटा क्र.1 वरील प्रमाणे परिपुर्ण असल्याशिवाय दुसरा लखोटा उघडणेत येणार नाही.

44.लखोटा क्रमांक 2 मध्ये फक्त परिपूर्ण भरलेले परिशिष्ठ 'ब' असावे.

४५. या अटी व शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे. या निविदेतील अटी व शर्तीबाबत

४६. कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. सातारा यांचा निर्णय अंतीम राहील व त्याबाबत न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद,सातारा.**